# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी – 22620601/22690602/22641150/22641151 फॅक्स - 2269 2102.
E-Mail: desk2a@dtemaharashtra.gov.in Internet: http://www.dtemaharashtra.gov.in

महत्वाचे

क्रमांक : २अ/एडीएम/२०१९/ ८६४
दिनांक : 29 NOV 2019

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद,अमरावती, नागपुर

**विषय** :- दुष्काळ परिस्थिती तसेच " क्यार" व "महा" चक्रीवादळामुळे आलेल्या अवेळी पावसाने नुकसान झालेल्या तालुक्यातील शेतक-यांचे पाल्य असलेल्या विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याबाबत...

संदर्भ : १) शासन परिपत्रक उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक शुल्क ५२१९/ प्र.क्र.३११/ मशि-२, दिनांक २१.११.२०१९
२) शासन परिपत्रक उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक संकीर्ण २०१९/ प्र.क्र.३५३/ तांशि-४, दिनांक २२.११.२०१९
३) शासन पत्र उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक शुल्क-२०१९/ प्र.क्र.३५२/विशि-३,दिनांक २२.११.२०१९

वरील विषयाबाबत कळविण्यात येते की, पर्जन्यतूट व अनुषंगिक बाबींमुळे प्रभावित झालेल्या आंबेजोगाई , जि.बीड व परांडा, जि उस्मानाबाद या दोन तालुक्यांमधील दुष्काळी परिस्थिती तसेच राज्यात माहे ऑक्टोबर नोव्हेंबर २०१९ मध्ये " क्यार" व "महा" चक्रीवादळामुळे निर्माण परिस्थितीमुळे झालेल्या अवेळी पावसामुळे शेती पिकांचे नुकसान झालेल्या आपदग्रस्त तालुक्यांमधील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफीसंबंधी संदर्भाधीन क्रमांक ३ च्या शासन पत्रान्वये प्राप्त आदेशानुसार खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

१. महसूल व वन विभागाच्या दिनांक १८.११.२०१९ च्या शासन निर्णयानुसार राजयातील ३४ जिल्हयातील ३२५ तालुक्यांमधील पिकांचे व बहुवर्षीय पिकांचे नुकसान झालेल्या ज्या शेतक-यांच्या पाल्यांनी शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील अभ्यासक्रमांकरिता प्रवेश घेतलेला आहे अशा विद्यार्थ्यांना चालू शैक्षणिक वर्षातील परीक्षा शुल्क माफ करण्याचे आदेश संदर्भाधीन शासन परिपत्रकान्वये निर्गमित करण्यात आले आहे.
२. तसेच शासन परिपत्रकाच्या दिनांकापर्यंत ज्या विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्क आकारण्यात आले आहे त्या विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क संबंधित संस्थेमार्फत परत करण्यात यावे
३. या सवलतीचा लाभ केवळ आर्थिकदृष्टया मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांपुरता मर्यादित राहिल. राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेखालील शिष्यवृत्तीसाठी पात्र असलेल्या विद्यार्थ्यांना ५०% इतकी रक्कम शिष्यवृत्तीच्या स्वरुपात देण्यात येत असल्याने, या योजनेखाली परीक्षा शुल्काच्या केवळ ५०% इतकी रक्कम माफ करण्यात यावी. तसेच रुपये

८.०० लाख पर्यंत कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न असलेल्या उर्वरीत विद्यार्थ्यांना १००% परीक्षा शुल्काची रक्कम माफ करण्यात यावी.

४. या योजनेवरील परीक्षा शुल्क माफीसाठी विद्यार्थ्यांकडून अर्ज प्राप्त करुन घेण्याची , विद्यार्थ्यांस या सवलतीसाठी पात्र ठरविण्याची आणि त्याप्रमाणे विद्यापीठाकडे / मंडळाकडे परीक्षा शुल्काची मागणी करण्याची जबाबदारी संस्थेची राहील.

सदर बाबी आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व पदविका,पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थांच्या तात्काळ निदर्शनास आणण्यात याव्यात. तसेच शासनाने उपरोक्त संदर्भाधीन परिपत्रकान्वये दिलेल्या निर्देशांची तात्काळ अंमलबजावणी करावी आणि केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल संचालनालयास सादर करावा. सोबत शासन पत्र व परिपत्रकाच्या प्रती जोडण्यात येत आहेत.

( डॉ.अभय वाघ )
संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत :

१. मा.सचिव,महाराष्ट्र शासन,उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन,मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर
२. सचिव,महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ,मुंबई यांना माहिती व उचित कार्यवाहीसाठी
३. कार्यासन क्रमांक २,३,१०,१८ मुख्य कार्यालय मुंबई यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी

अत्यंत महत्वाचे

क्र. विकाऔ/शिक्षण/२०१९/ 3656
दिनांकः- 9 DEC 2019

या कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या सर्व शासकीय / अशासकीय अनुदानित / विनाअनुदानित सर्व व्यावसायिक पदविका, व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थां प्रमुखांना सुचित करण्यात येते की, दुष्काळ परिस्थिती तसेच क्यार व महा चक्रीवादाळामुळे आलेल्या अवेळी पावसाने नुकसान झालेल्या तालुक्यातील शेतकऱ्यांचे पाल्य असलेल्या विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याबाबत सोबत जोडलेल्या संदर्भिय शासन पत्रान्वये प्राप्त आदेशानुसार कार्यवाही करण्यात यावी.

**(महेश शिवणकर)**
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

प्रत :- या कार्यालयाचे प्रोग्रामर यांना या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी.

महाराष्ट्र शासन

क्र. शुल्क-२०१९/प्र.क्र. ३५२/विशि - ३
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दि. २२ नोव्हेंबर, २०१९

प्रति,

१. कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे.
२. कुलसचिव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, जि. रायगड
३. कुलसचिव, कवि कुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक, जि.नागपूर
४. कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.

विषय:- विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याबाबत.
संदर्भ:- (१) शासन परिपत्रक क्र. शुल्क-५२१९/प्र.क्र.३११/मशि-२, दि.२१ नोव्हेंबर, २०१९
(२) शासन परिपत्रक:- संकीर्ण २०१९/प्र.क्र. ३५३/तांशि-४ दि.२२ नोव्हेंबर, २०१९

महोदय,

जून ते सप्टेंबर या कालावधीत पर्जन्य तूट व अनुषंगिक बाबीमुळे प्रभावित झालेल्या आंबेजोगाई, जि.बीड व परांडा, जि.उस्मानाबाद या दोन तालुक्यामधील दुष्काळी परिस्थिती तसेच राज्यात माहे ऑक्टोंबर-नोव्हेंबर, २०१९ मध्ये "क्यार" व "महा" चक्रीवादळामुळे निर्माण परिस्थितीमुळे झालेल्या अवेळी पावसामुळे शेती पिकांचे नुकसान झालेल्या आपदग्रस्त तालुक्यांमधील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफीसंबंधी संदर्भीय परिपत्रक क्र.१ व २ अन्वये निर्देश दिले आहेत. (प्रत संलग्न) त्यानुसार तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी व केलेल्या कार्यावाहीचा अनुपालन अहवाल विभागास तात्काळ सादर करावा, ही विनंती.

आपला,

(प्रविणकुमार पवार)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

सहपत्र : वरीलप्रमाणे

प्रत माहिती तथा आवश्यक कार्यवाहीस्तव अग्रेषित:-

१. संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३. संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

दुष्काळ परिस्थिती तसेच "क्यार" व "महा" चक्रिवादळामुळे आलेल्या अवेळी पावसाने नुकसान झालेल्या तालुक्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक : शुल्क-५२१९/प्र.क्र.३११/मशि-२,**
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २१ नोव्हेंबर, २०१९.

वाचा : (१) शालेय शिक्षण विभाग, शासन निर्णय, क्रमांक:एफईडी-१५९२/१२०२/(११३२)/ साशि-५, दिनांक १८.१०.१९९३.
(२) महसूल व वन विभाग, शासन निर्णय, क्रमांक : एससीवाय-२०१९/प्र.क्र.२२०/म-७, दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१९.
(३) महसूल व वन विभाग, शासन निर्णय, क्रमांक : सीएलएस-२०१९/प्र.क्र.१९१/म-३, दिनांक १८ नोव्हेंबर, २०१९.

**शासन परिपत्रक :**

उपरोक्त संदर्भाधीन क्रमांक-१ येथील शासन निर्णयान्वये राज्यातील टंचाईग्रस्त भागातील विद्यार्थ्यांची विद्यापीठ व परीक्षा मंडळे यांची परीक्षा फी माफ करण्याची योजना लागू केली आहे. यामध्ये अकृषी विद्यापीठांकडून घेण्यात येणाऱ्या परीक्षांचा समावेश आहे. आता महसूल व वन विभागाने संदर्भाधीन क्रमांक २ येथील शासन निर्णयान्वये जून ते सप्टेंबर या कालावधीत पर्जन्य तूट व अनुषांगिक बाबीमुळे प्रभावित झालेल्या आंबेजागाई, जि.बीड व परांडा, जि.उस्मानाबाद या दोन तालुक्यांमध्ये दुष्काळ घोषित करुन काही सवलती लागू केल्या आहेत. तसेच, संदर्भाधीन क्रमांक ३ येथील शासन निर्णयान्वये राज्यात माहे ऑक्टोबर-नोव्हेंबर, २०१९ मध्ये "क्यार" व "महा" चक्रिवादळामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे झालेल्या अवेळी पावसामुळे राज्यातील ३४ जिल्ह्यातील ३२५ तालुक्यांमध्ये शेतीपिकांचे व बहुवार्षिक पिकांचे नुकसान झालेल्या आपदग्रस्त शेतकऱ्यांना मदत व सवलती लागू केल्या आहेत. सदर तालुक्यातील शेतकऱ्यांना लागू केलेल्या सवलतीमंध्ये महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याची सवलत लागू केलेली आहे. यास्तव सदर दुष्काळी परिस्थिती व आपदग्रस्त तालुक्यांमधील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफीसंबंधी संदर्भाधीन क्रमांक-१ येथील शासन निर्णयातील तरतुदीनुसार तात्काळ कार्यवाही करण्यात यावी. यासाठी आवश्यक असल्यास निधीची तरतूद करण्यासाठी संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी तातडीने शासनास प्रस्ताव सादर करावा.

२. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून, त्याचा संकेतांक क्रमांक २०१९११२११२५५०७५१०८ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Rohini Bhalekar

Digitally signed by Rohini Bhalekar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher And Technical Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=440c600559857f4234e969f892346c88247ac81346a1b7229bf9917deb7bce48, cn=Rohini Bhalekar
Date: 2019.11.21 15:01:56 +05'30'

**( रोहिणी भालेकर )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**

१. सर्व जिल्हाधिकारी,
२. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
३. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण (संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांच्यामार्फत),
४. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई,
५. उप सचिव (म-७ व म-३), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई,
६. कार्यासन अधिकारी (म.शि.३), उच्च व तंतर् शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई,
७. निवड नस्ती (म.शि.२).

“क्यार” व “महा” चक्रिवादळामुळे आलेल्या अवेळी पावसाने नुकसान झालेल्या तालुक्यातील शेतकऱ्यांचे पाल्य असलेल्या विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
**शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-२०१९/प्र.क्र.३५३/तांशि-४**
मंत्रालय विस्तार भवन, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २२ नोव्हेंबर, २०१९

**वाचा :** १) शालेय शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.एफईडी-१५९२/१२०२/(११३२)/साशि-५, दिनांक १८/१०/१९९३
२) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक सीएलएस-२०१९/प्र.क्र.१९१/म-३, दिनांक १८ नोव्हेंबर,२०१९
३) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक एससीवाय-११/२०१९/प्र.क्र.८१/म-११, दिनांक १९ नोव्हेंबर,२०१९

**परिपत्रक :**

महसूल व वन विभागाच्या वर अनुक्रमांक २ येथील दिनांक १८ नोव्हेंबर,२०१९ च्या शासन निर्णयाव्दारे माहे ऑक्टोबर-नोव्हेंबर,२०१९ मध्ये “क्यार” व “महा” चक्रिवादळामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे झालेल्या अवेळी पावसामुळे राज्यातील ३४ जिल्ह्यांतील ३२५ तालुक्यामध्ये शेतीपिकांचे व बहुवार्षिक पिकांचे नुकसान झालेल्या आपद्‌ग्रस्त शेतकऱ्यांना विशेष दराने मदत व सवलती देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या शासन निर्णयाव्दारे आपद्‌ग्रस्त शेतकऱ्यांना विविध सवलती जाहिर करण्यात आल्या असून त्यापैकी एक सवलत “शेतीपिकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांच्या पाल्यांना शाळा व महाविद्यालयीन परीक्षा शुल्कामध्ये माफी” ही आहे. याबाबत संबंधित प्रशासकीय विभागांनी आवश्यकतेनुसार सविस्तर आदेश निर्गमित करावेत व त्याबाबत आवश्यक निधीची तरतूद करुन ती माफ करण्यात यावी, अशा स्वरुपाचे आदेश देण्यात आले आहेत. त्यास अनुसरुन महसूल व वन विभागाच्या शासन निर्णयानुसार फायदा देण्याकरीता खालीलप्रमाणे आदेश सर्व विद्यापीठांना तसेच महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळास देण्यात येत आहेत :-

१) महसूल व वन विभागाच्या दिनांक १८ नोव्हेंबर,२०१९ च्या शासन निर्णयानुसार राज्यातील ३४ जिल्हयातील ३२५ तालुक्यांमधील पिकांचे व बहुवर्षीय पिकांचे नुकसान झालेल्या ज्या शेतकऱ्यांच्या पाल्यांनी शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितील अभ्यासक्रमांकरीता प्रवेश घेतलेला आहे अशा विद्यार्थ्यांना चालू शैक्षणिक वर्षातील परीक्षा शुल्क माफ करण्यात यावे.

२) या शासन परिपत्रकाच्या दिनांकापर्यंत ज्या विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्क आकारण्यात आले आहे त्या विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क संबंधित संस्थेमार्फत परत करण्यात यावे.

३) या सवलतीचा लाभ केवळ आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांपूरता मर्यादित राहिल. राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेखाली शिष्यवृत्तीसाठी पात्र असलेल्या विद्यार्थ्यांना ५०% परीक्षा शुल्क शिष्यवृत्तीच्या स्वरुपात देण्यात येत असल्याने, या योजनेखाली परीक्षा शुल्काच्या केवळ ५० % इतकी रक्कम माफ करण्यात यावी. रुपये ८.०० लाख पर्यंत कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न असलेल्या उर्वरित विद्यार्थ्यांना १०० % परीक्षा शुल्काची रक्कम माफ करण्यात यावी.

४) या योजनेवरील परीक्षा शुल्क माफीसाठी विद्यार्थ्याकडून अर्ज प्राप्त करुन घेण्याची, विद्यार्थ्यास या सवलतीसाठी पात्र ठरविण्याची आणि त्याप्रमाणे विद्यापीठाकडे / मंडळाकडे परीक्षा शुल्काची मागणी करण्याची जबाबदारी संस्थेची राहिल.

५) यासाठी होणारा खर्च सर्व संबंधित विद्यापीठांनी तसेच महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाने स्वत:च्या जमा निधीतून भागवावा.

६) हे आदेश स्वायत्त संस्थांना देखील लागू राहतील.

४. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१९११२२१६०१३१५२०८ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SANJAY AUDUMBAR
DHARURKAR

**( संजय औ. धारुरकर )**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१. कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे
२. कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, जि.रायगड

**प्रत :**

१) संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३) संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
४) सर्व सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये.
५) सर्व उपसचिव/कार्यासन क्र.विशि-३/तांशि-३/साशि-१/ताशि-५, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
६) महसूल व वन विभाग / सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग / आदिवासी विकास विभाग / विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग / वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग /कृषि व पदुम विभाग, मंत्रालय मुंबई
७) निवड नस्ती (तांशि-४).

दुष्काळ परिस्थिती तसेच " क्यार" व "महा" चक्रीवादळामुळे आलेल्या अवेळी पावसाने नुकसान झालेल्या तालुक्यातील शेतक-यांचे पाल्य असलेल्या विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याबाबत संचालनालयाचे पत्र क्रमांक २अ/एडीएम/२०१९/८६४, दिनांक २९.११.२०१९ अन्वये सूचना निर्गमित केल्या आहेत.

त्यानुसार महसूल व वन विभागाच्या दिनांक १८.११.२०१९ च्या शासन निर्णयानुसार राजयातील ३४ जिल्हयातील ३२५ तालुक्यांमधील पिकांचे व बहुवर्षीय पिकांचे नुकसान झालेल्या ज्या शेतक-यांच्या पाल्यांनी शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील अभ्यासक्रमांकरिता प्रवेश घेतलेला आहे अशा विद्यार्थ्यांना चालू शैक्षणिक वर्षातील परीक्षा शुल्क माफ करण्याचे आदेश शासन परिपत्रकान्वये निर्गमित करण्यात आले आहे. त्यानुसार खालील विवरणपत्रातील पदविका,पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमनिहाय **माहिती या कार्यालयास आज सांय ५.०० वाजेपर्यंत ईमेल द्वारे सादर करावी.**

| | शुल्क माफीसाठी पात्र असलेल्या विद्यार्थ्यांची संख्या | शुल्कमाफीसाठी प्रत्यक्षात अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांची संख्या | शासन परिपत्रक निर्गमित होण्यापूर्वी ज्या विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्क आकारण्यात आले आहे त्या विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क संबंधित संस्थेमार्फत परत केले अशा विद्यार्थ्यांची संख्या |
|---|---|---|---|
| पदविका | | | |
| पदवी | | | |
| पदव्युत्तर पदवी | | | |